श्री.

भामाविलासनाटक.

हें पुस्तक.

मालवण येथें

माहादेव विनायक केळकर.

यांणीं

तयार केलें तें.

सर्व प्रकारच्या हक्कासह विकत घेऊन

सोनु भिंव मांजरेकर.

यांणीं

विचारदर्शक छापखान्यांत छा.

सन १८८७ इसवी.

५ रु.

प्रस्तावना.

एके दिवशीं नारद मुनी इंद्रसभेस गेले होते, त्या समयीं इंद्रानें षोडशोपचारें मुनीची पूजा करून मुनीस पारिजातकाचें पुष्प अर्पण केलें. तें मुनीनीं श्रीकृष्णास आणून दिलें व श्रीकृष्णानीं रुक्मिणीस दिलें, त्यामुळें रुक्मिणीचा व सत्यभामेचा कलह झाला. शेवटीं श्रीकृष्णानीं सत्यभामेच्या मंदिरीं जाऊन तिची समजूत केली. व पारिजातकाचा वृक्ष आणून सत्यभामेच्या दारांत लावण्याचें कबूल केलें. ही कथा यांत नाटक रूपानें लिहिली आहे.

यांतील दोष त्याग करून विद्वज्जनांनीं गुण ग्रहण करावे असी विनंती आहे.

ग्रंथकर्ता.

प्रवेशपहिला.

पात्रें:—(सूत्रधार व नटी.)

सूत्रधार:— (मंगलाचरण करीत करीत गुलाल व पुष्पें उधळीत येतो.) हे जगंनियंत्या जो तूं कोणी उत्पत्तिस्थितिलय कर्ता आहेस त्या तुझ्या चरणीं हीं पुष्पें अर्पण करितों आहें. मनुष्याचें मुख्य कर्तव्यकर्म म्हटलें म्हणजे तुझी प्रसन्नता संपादावी हेंच होय. पण ती संपादण्यास जीं जीं कांहीं साधनें पाहिजेत तीं आम्हांस अनुकूळ नाहींत यामुळें आम्हीं अगदीं दीन आहों, यांत शंका नाहीं. तरी मनांत भाव धरून जे तुझा एकाग्रचित्तें यथामतिस्तव करितात त्यांस तूं प्रसन्न होतोस असी तुझी कीर्ति आहे. तेव्हां मी जरी अल्पज्ञ आहें तरी तूं मजवर कृपा न करिशील असें नाहीं. तुझ्याच इच्छेनें सर्व जगाचा व्यापार चालत आहे. वृक्षाचें पान हालणें एवढाही सूक्ष्म व्यापार तुझ्या इच्छेशिवाय होत नाहीं. मग आमचा जो सर्वप्रकारचा व्यापार चालला आहे तो तुझ्या इच्छेनें चालला आहे यांत काय संदेह आहे! आम्हीं करितों असा जो अभिमान आहे तो व्यर्थ आहे; सर्व आपली सेवा आमच्या हातून करून घेतोस; आम्ही हे निमित्त्यास मात्र कारण आहों. तरी रीतीप्रमाणें आतां इतकेंच म्हणतों; परमेश्वरा आतां ही जी मी तुझी सेवा करीत आहें, ती मान्य करूनघ्यावी. (पडद्याकडेपाहून.) प्रिया कांबरें अद्याप आली नाहीं! तिचें मला साह्य आहे म्हणुनच माझ्या हातू-

न मोठमोठीं कार्यें होतात. पण हें आम्हां मनुष्यांस-च काय पण ज्यांनीं सर्व त्रैलोक्य रक्षणाचा भार म-स्तकीं घेतला आहे असे जे ईश्वर रूपी ब्रम्हा, विष्णु, महेश यांचीहीं कार्यें त्याच्या प्रियांच्या साह्यानेंच सिद्धीस जातात. मग आम्हां दुर्बल मानवांची कथाकाय? (पुन्हा पडद्याकडे पाहून.) आलिवाटतें प्रिया!

नटी :— प्राणनाथ नेमस्कार करितें.

सूत्रधार :— आलीस, फार चांगलें झालें. मी तुझी केव्हां पासून वाटपाहात होतों. सभाजन नाटकावलो कना विषयीं अगदीं उतावीळ होऊन गेले आहेत.

नटी :— प्रिया सांगातर काय आज्ञा आहे ती, सभाजनांचें मन रंजन करणें हें काम तर आपणच करीत अहां. तरी पण नेहमीं तें श्रय मलाच देत अहां. आम्हीं स्त्रिया म्हटल्या म्हणजे अगदीं दुर्बल आहों, तरी पण आपल्या आश्रयें करून शोभतों.

सूत्रधार :— प्रिये, पण हें काय म्हणत आहेस तूं. अग आमच्याच आश्रयें करून तुम्हीं शोभतां असेंनव्हे, तर तुमच्या आश्रयें करून आम्हीं शोभतों व आमच्या आश्रयें करून तुम्हीं शोभतां हें खरेंआहे; आणि ईश्वराचा संकेत असाच दिसतो. इतकें लांब कशाला सभाजनांचे मनरंजनार्थ जो आम्हीं प्रयोग करून दाखवितों, तो तुझ्या साह्या शिवाय कधींच सिद्धीस जाणार नाहीं.

नटी :—आहाहा! केवढा तरी थोरपणा मिळतो आहे हा. आपण आपलें पाहिजे तसें मानून घ्यावें.

सूत्रधार :— बरें पण प्रिये पात्रांची सिद्धता झालीआहे कीं नाही? कां म्हणशील तर रात्र बरीच होऊन गेली आहे.

नटी :— पात्रांची सिद्धता आहेच. पण गजाननादिइष्ट सिध्द करून देणारीं जीं दैवतें त्याचें स्तवन नाहीं कुठें केलें तें?

सूत्रधार :— प्रिये, तें तर आरंभींच केलें आहे; आणि तें तितकें पुरे आहे. त्यांची आम्हांवर कृपा आहे, यांत अजूनही तुला कां संशय आहे?

नटी :— बरें, प्रियकरा आज कोणत्या नाटकाचाप्रयोग करून दाखविण्याचें मनांत आणिलें आहे?

सूत्रधार :— प्रिये, नारदानें पारिजातकाचें पुष्प कृष्णीला आणून दिलें; तें कृष्णानें रुक्मिणीला दिलें. म्हणून रुक्मिणीचा आणि सत्यभामेचा कलह झाला. ही कथा तुला ठाऊक आहेना?

नटी :— आहे; पुढें कृष्णानें सत्यभामेची समजूत करून तो कलह मिटविला. ही कथा आहेमला ठाऊक.

सूत्रधार :— प्रिये, वेत्रधार मार्ग मोकळा करीत आहे व श्रीकृष्णाची स्वारी इकडे येत आहे असें वाटतें. तर चल आपण आतां जाऊं.

कचेरीपहिली.

पात्रें :—नारद, कृष्ण आणि सेवक.

सेवक :—(कृष्ण कांहीं विचार करीत बसला आहे, इतक्यांत.) मुजरा करून महाराज देवर्षिंची स्वारी येत आहे.

कृष्ण :—बरँ आहे. निष्प्रतिबंध आंत येऊंदे नारदांची स्वारी.

सेवक :—आज्ञा. (नारद मुनी चिपळ्या घेऊन भजन करीत येतात.) जयजयनारायण हरी, सांवळ्या-नारायण हरी ॥

कृष्ण :—मुनिश्रेष्ठा, आपलँ आगमन कुणीकडून झालँ तें ऐकावँ व कुठँ कांहीं चमत्कार झाला असेल तर तोही ऐकावा अशी इच्छा झाली आहे. आपल्यास कोणत्याही ठिकाणीं जें होईल तें सर्व कळत असतँ. कारण सर्व त्रैलोक्यांत आपण लोककल्याणार्थ फिरत असतां व भूत, भविष्य, वर्तमान, जाणत अहां. तर या सेवकास आपल्या आगमनाचँ कारण व कुठँ कांहीं चमत्कार झाला असल्यास सांगून तृप्त करावा. चंद्राच्या उदयानें जशीं चंद्रविकासित कमळें प्रफुल्लित होतात, त्या प्रमाणें आपल्या आगमनानें अंतःकरण पहा कसें प्रफुल्लित झालें आहे.

नारद :—देवा, तुला जें सांगणें तें आपल्यास सांगतां यावँ म्हणून सांगायाचँ. तेणें करून तुला समजणार असँ नव्हे. तर तुला पुष्कळ समजतँ आहे,

आणि माझ्या सारख्या अल्पज्ञानें सांगायाचें त्यांत आपला परिचय नीट होण्यासाठीं गुंडिकाच करायाची. तीः- श्लोक. ॥ विशेषविदुषःशास्त्रंयत्तवोद्ग्राह्यतेपुरः ॥ हेतुःपरिचयस्थैर्येवक्तुर्गुणनि-कैवसा ॥१॥ परिचय नीटहोण्याविषयीं कारणभूत अशी गुंडिकाच. ती कुठली तर पुष्कळ जाणणाराच्या तुझ्यापुढें जें शास्त्र बोललें जातें ती गुंडिकाच जाणावी. म्हणजे तें ऐकून तुला समजणार असें नव्हे, तर तुला पुष्कळ समजतेंच आहे, तिथें माझ्यासारख्या अल्पज्ञानें जें सांगणें त्यांत आपला परिचय स्थीरकरण्यासाठीं गुंडिकाच ती असेंजाणून बोलावें. तुला माहीत नाहीं अशी कोणतीच गोष्ट नाहीं. आम्हांला जें सर्वज्ञत्व प्राप्त झालें आहे तें तुझ्या सेवेनेंच झालें आहे. तूं क्षीरसमुद्राचा जामात, लक्ष्मीपति, वैकुंठवासी अधर्माचा नाश करूनधर्माची स्थापना करण्यासाठीं व दुष्टांचा नाश करून सज्जनांचा प्रतिपाल करावा म्हणून अवतार धारणकेला आहेस असें मी जाणत आहें. तेव्हां तुला माहीत नाहीं अशी कोणती गोष्ट आहेबरें? व तुला जी माहीत नाहीं ती सांगण्याजोगा ज्ञानी कोण आहे? ज्ञानस्वरूप तूं. तुझ्याठायीं जे भक्तिमान झाले, ते तुझ्या प्रसादानें ज्ञान संपन्न होतात; तेव्हां ज्याचीसेवा ज्ञान देते त्या तुला माहीत नाहीं अशी कोणतीच गोष्ट नाहीं. मला जरी तूं एवढा थोरपणा दिलास तरी मी आपली योग्यता जाणत आहें. व तुझेंस्वरूप जाणत असल्यामुळें माया जाळांत गुंतलोंनाहीं

सर्व त्रैलोक्याची उत्पत्ति स्थिति व नाश एकटा तूं क. रीत आहेस. श्लोक. ॥ यथोर्णनाभीहृदयाद्रूर्णांसितत्य वक्तः ॥ तयाविह्यत्यभूयस्तांग्रसत्येवंमहेश्वरः ॥ १ ॥ जसा कोळी आपल्या उदरांतून सूत्र तंतु उत्पन्न करून जाळें निर्माण करितो, तसा तू आपल्या मायेच्या योगानें हें विश्वरूप जाळें करितोस. व तो कोळी त्या जाळ्यानें जशी कांहीं काळ क्रीडा करितो, तसा तूं या विश्वानें कांहीं काळ पर्यंत क्रीडा करितोस. आणि जसा तो कोळी आपले अंतःकरणांत येईल तेव्हां तें जाळें गिळितो, तसें तूं विश्वाचें आकलन मनांत येईल तेव्हां करितोस. पुन्हा ज्यावेळीं त्या कोळ्याचे मनांत जाळें करावें सेंवाटेल त्या वेळीं पुन्हा करीत असतो. तसा तूं विश्वाची उत्पत्ति स्थिति व नाश हीं करितोस. असा अनंतकोटी ब्रह्मांडनायक जो तूं त्या तुला कोणत्याही एका ब्रह्मांडांतील एकजंतू जो मी यानें काय सांगून कळावयाचें आहे ? परंतु ज्यापेक्षां विचारतोस त्यापेक्षां सांगतों ऐक. सहज फिरत फिरत इंद्राच्या सभेंत गेलोंहोतों. तर ती सभेची शोभा किती वर्णावी ! सहस्त्रावधि रत्नखचित स्तंभ त्या सभेला आहेत. म्हणजे किंप, वैडूर्य, पद्मराग, गारुत्मत, माणिक्य, इंद्रनील, स्फटीक अशा मण्याचे स्तंभ आहेत. त्यांचा निरनिराळा प्रकाश त्या सभेमध्यें फांकला होता, अशी रम्य ती सभा पाहिली. तेणें करून संतोष झाला. पुढें सभे मध्यें इंद्रानें दिलेल्या सिंहा-

सनावर बसलों. सर्वांस आणि इंद्रास बसण्या विषयीं सुचविलें. पुढें इंद्रानें माझनी पूजा केली. उर्वशी, मेनका, तिलोत्तमा, रंभा, यांचें गायन नृत्य अवलोकन केलें, आणि फार आल्हाद झाला. काय त्यांचीं स्वरूपें सुंदर म्हणून सांगूं! अहाहा! जशा विद्युल्लता तसे त्यांचे देह सुंदर कांतीचे होते. व वांक्या, बाजुबंद, नूपुरें, तोडर, मोत्यांचे हार, चंद्रकोर, चंद्रहार, इत्यादि व रत्नखचित देहभर अलंकार पाहून मोह उत्पन्न झाला, नेत्र दिपून गेले. असा कांहिं काळ तो चमत्कार पाहून घेतल्यावर मांझनी अशी खात्री झालीकीं, देवसभेंत वास्तव्य होण्या विषयीं सोमयाग, अग्नोयाम, वाजपेय, राजसूय, बृहस्पतीसव, अश्वमेध, असे शेंकडों यज्ञ करावे लागतात. तें योग्य आहे कारण ही शोभाच तशी आहे. पुढें चित्रसेन प्रमुख गंधर्वांचें गायन सुरू झालें, ते हरिगुण फार सुस्वर, चित्रसेन, तुंबरु, विश्वावसु, यांच्या मुखांनीं ऐकून अतिशय आनंद झाला. मग चंद्रा प्रमाणें शुभ्र चतुर्दंत ऐरावत हस्ती पाहिला. कामधेनु, चिंतामणि कल्पवृक्ष, हीं रत्नें पाहिलीं. त्या ठिकाणीं पूजेंत पारिजात पुष्प इंद्रानें मला समर्पण केलें. काय त्या पुष्पाचा सुगंध सांगूं! अहाहा! असें अलौकिक पुष्प कोणास तरी द्यावसें वाटलें. बर कोणास द्यावें असा विचार करूं लागलों तो तूंच योग्य असें वाटल्यामुळें या ठिकाणीं आलों आहें.

कृष्ण:— आपण आल्या पासून या ठिकाणीं सुगं-

धानें अतिशय गर्दी केली आहे, ती अशी कीं, सर्व सभेसभोंवते भ्रमरांचे थवे आपला झंकार शब्द करीत करीत अगदीं गोंधळून गेले आहेत. व आम्हीही सुगंध असा अलौकीक कुठून आला म्हणून विचार करीत होतों तो हाच असेल असँवाटतें

नारद :— होय त्याचाच हा. व दुसरा याचा गुणअसा आहेकीं, बहुत दिवस झाले तरी हें फूल म्लान होत नाहीं. तर हें तूं अंगिकारावेंस अशी उत्कंठा झाली आहे. हें तुला घे. (असें म्हणून पुष्प पुढें करितात.)

कृष्णा :— (तें पाहून.) मुनिराज, आज आपण येऊन मला पवित्र केलें; तेणें करून मी कृतकृत्य झालों. अशी दुर्लभ वस्तु मला आपल्या कृपेनें प्राप्त झाल्यामुळें मी आज मोठा भाग्यवान् असें मानितों. समुद्रांत उत्पन्न झालेल्या रत्नाचें फूल हें. मग याचा असा प्रभाव योग्य आहे.

नारद :— बरें कृष्णा मी जातों आतां.

कृष्णा :— कृपा असावी वंदन करितों.

(पडदा पडतो.)

प्रवेशदुसरा.

पात्रें :— रुक्मिणी, दासी चमेली, भद्रमुखी, लवंगी आणि कृष्णा.

रुक्मिणी :— कोणग आहे तिथें चमेली ?

चमेली :— जी, जी सरकार. अजि आई साहेब, इथें जवळ लवंगी असायाची म्हणून बेफाम राहिलें. इतक्यांत कुठें गेली नकळे.

रुक्मिणी :— दरवाजावरग कोण आहे?

चमेली :— आई भद्रमुखी आहे.

रुक्मिणी :— काय करत्ये आहे? बलाव तिला इकडे. हाक दे. (हाक दिलेली ऐकून ती भीतभीत जवळ येते.)

रुक्मिणी :— आलीग भद्रमुखी?

भद्रमुखी :— जी, आल्यें आहें; काय आज्ञा ऐकत आहें.

रुक्मिणी :— काय करत्ये आहेस?

भद्रमुखी :— काल आज्ञा झाल्या प्रमाणें कशिदा काढीत दरवाजावर होतें.

रुक्मिणी :— आतां स्वप्नांत माझ्यावर रुसावाकेला म्हणून मी भीत आहें. (इतक्यांत लवंगी आली) कोणग ती लवंगी?

लवंगी :— जी.

रुक्मिणी :— कायग. कुठें गली होतीस? खबरदार, पुन्हा अशी बेफाम राहिलीस तर. सांगुन पहातें आधिं!

लवंगी :— नाहीं सरकार! आई मीं येथें गजरा ठेविला होता. तो आतां मागायाचा होईल म्हणून पाहिला तो आढळेना, म्हणून दुसरा करून आणायला गेल्यें, तेव्हां उशीर झाला. (असे म्हणून

हार, तुरे, गजरे, एकत्र ताटांत घालून ताट पुढें केलें. आणि हातांत पंखा घेऊन वारा घालीत उभी राहिली

रुक्मिणी :— लवंगे, प्राणवल्लभाची स्वारी इतक्यांत यावी. कांबरें वेळ लागला? किती घंटा झाल्या पहा बरें?

लवंगी :— चार घंटा झाल्या.

रुक्मिणी :— तर इतक्यांत स्वारि यावी. काय स्वभाव आहेतो.. जशी चंद्रावांचून कुमुदिनी म्हणजे चंद्रविकासी कमळिणी प्रफुल्लित होत नाहीं, तशीमाणनाथावाचून माझ्याचित्तास प्रसन्नता येतच नाहीं. मग आले काय, म्हणून मार्ग लक्षीत असतें. त्यांचा तरी नाइलाज आहे. इतकीं राज्याचीं व्यवथानें धरून आम्चीं भेटीची वेळ तेम्हणूनच रारवतात. जसा थोर तसा त्यास व्यवहारही थोर असतो. मिळूनत्यास स्वस्थपणा नाहीं तो नाहीं. पहा, श्लोक. भानुः सकृद्युक्ततुरंग एव रात्रिंदिवंगंधवहः प्रयाति ॥ शेषः सदैवाहित भूमिभारः षष्ठांशवृत्तेरपिधर्मएषः ॥१॥ लवंगे? सूर्य इतका थोर आहे, पण त्यास मोकळीक जर म्हणावी तर म्हणतात, रथास त्यानें एकवारच घोडे बांधले आहेत. त्या नंतर सोडलेच नाहींत, मग पुन्हा बांधण्याचा प्रसंग कुठून येईल? इतका थोर त्याची ही दशा. तसेंच वारा इतका थोर असून त्यास थार नाहीं. रात्रंदिवस फिरावें अशी त्यासही मर्यादा. तसेंच शेष मस्तकावर भूगोल धरून राहिला आहे. त्यास बिसावा नाहीं. अशा लोकपतींची ही दशा! आणि

साहावा हिस्सा प्रजेपासून घेऊन निर्वाह करणारा राजा जो त्यासंही राज्यव्यवथानें आहेतच. म्हणून सर्वास बंधन म्हणून आहेच. असो. निरंतर चकोर चंद्र दर्शनाची उत्कंठा करितात. त्याप्रमाणें प्राणनाथाच्या दर्शनाची इच्छा करीत काळ घालवित्यें. चंद्रोदय झाल्या वांचून सर्व त्रैलोक्य जसें चकोरांस असून व्यर्थ, तसें नाथाच्या उदया वांचून सर्व भोग मलाअसून नसल्यासाररवे होतात.

लवंगी :— प्रीति जिथें आहे तिथें मनास सतत रहावसें वाटतें. ती वस्तु दुरावली म्हणजे वियोग दुःख होतें. जसा जला वांचून मासा तळमळ करितो तसें प्रीय वस्तूवांचून चित्त तळमळत असतें. सरकार हें काय मी सांगून शहाणी होत्यें आपण जाणतच अहां.

रुक्मिणी :— इतकें मात्र खरें कीं, जसा चांगला आरसा असेल तसा त्यामध्यें ठसा चांगला उठतो. त्याप्रमाणें माझ्या स्वामीचा ठसा माझ्या चित्तांत नीट उठला आहे. त्यावरून तें चित्त शुध्दअसेल असें वाटतें. आले कायग, (भद्रमुखीस हाक मारते.) भद्रमुखी?

भद्रमुखी :— जी.

रुक्मिणी :— शिवताना अगदीं एकाग्र होतें नाहीं बरें? दुसरें वस्तु दिसत नाहीं!

भद्रमु॰— जी. माझी दृष्टि मार्गाचकडे आहे. त्यांतून सवड झाल्यास कशिद्याचें काम करीत आहें.

रुक्मिणी :— आज स्वप्नांत माझ्यावर राग केलाम्हणून जागी झाल्या पासून मनाला हुरहुर लागला आहे. काय होईल कोण जाणें ! देवा, स्वामीची पूर्ण मर्जी तुझ्याकडे मागत्ये आहें. (इतक्यांत श्रीकृष्ण पुष्प घेऊन वेत्रधारा सह येतात,)असें पाहून भद्रमुखी कळवायास येत्ये).

भद्रमुखी :— आई साहेब स्वामीची स्वारी येतआहे. (असें ऐकून रुक्मिणी उठून उभी राहिली, सर्वदासी एकत्र उभ्या राहिल्या, भगवान पलंगावर येऊन बसले. रुक्मिणीनें विडा पुढें केला तो घेऊन तूं बैस असें सांगितल्या वरून रुक्मिणी जवळ बसली. नंतर सर्व दासी कृष्णास वंदन करून कोणी पंखा, कोणी पिकदाणी घेऊन सेवा करूं लागल्या. नंतर वेत्रधार पुढें येऊन रुक्मिणीस मुजरा करितो. नंतर कृष्णास निरोपाचा मुजरा करून निरोप झालाच कीं काय असा निघून जातो.मग रुक्मिण कृष्णास म्हणते.)

रुक्मिणी :— प्राणनाथ? (मध्येंच म्हणते भद्रमुखी?) जा, दरवाजवर राहा. आणि श्रेष्ठ मनुष्य कुणी येईल तर पाहून सांगत जा, समजलें? ती आज्ञा. असें म्हणून आपल्या कामावर जाते.) मनोहरा? कांबरें उशीर केला या दासीस दर्शन देण्यास?

कृष्ण :— उशीर ! हा उशीर कशानँ झाला. बरें तूं आज अशी भ्याल्या सारखी कां दिसत्येस?

रुक्मिणी :— आपल्या पासून अभय असल्यास भय-देणारा दुसरा कोण आहे ?

कृष्ण :— हां! माझ्या पासून अभय नाहीं, असें कोणी सांगिलें ?

रुक्मिणी :— कोण सांगणार आहे ? आज मला स्वप्नामध्यें आपण रुसलां म्हणून उठल्या पासून भय दिसत आहे. तर अभय आहेना ?

कृष्ण :— हे भिरु कायबरें बोलतेस हें! स्वप्नांतला भय तो काय आणि इतकी भितेस हें काय ? काळा-पासून सुध्दां तुला तिलमात्र भीति होणार नाहीं. असें असून तूं स्वप्ना पासून इतकी भित्येस हें काय. छीवेडे! उगाच तूं भितेस. माझा स्वभाव तूं ओळखत नाहींसकीं काय ? (असें म्हणून हनुवटीस धरून चुंबन घेतात. रुक्मिणी कृष्णाचा हात आपल्या हृदयावर ठेऊन दाखविते. कृष्ण तिचें हृदय धड, धड, धड, धड उडत आहे असें पाहून म्हणतात.)

कृष्ण :— हे अबले ? अबला हें नांव तुला शोभेल. पहा; रज्जु खंडावर अंधारांत सर्पाचा भास होऊन पहाणाऱ्यास जसें भय देतो, तसा माझ्या ठिकाणीं भयाचा संभव मानून तूं भित्येस हें काय बरें ? हे सुंदरी माझ्या पासून तुला भय व्हावें असें जर माझ्या मनांत असेल तर ह्या तुझ्या कंठाचीच शपथ.

रुक्मिणी :— प्राण सख्या ? आपली अविच्छिन्न प्रीति माझ्या ठिकाणीं असावी; आणि आपलेंदा-

कृष्ण :— ज्यास गरज असेल त्यानँ शोधून काढावँ.
रुक्मिणी :— कायग बाई हें. ! गरज असली म्हणून पुरुषाच्या हाताला झोंबून कसँ घ्यावँ? द्या म्हणजेझा लँ.
कृष्ण :— उगाच ज्याचँ त्यानँ दिलँ तर त्यांत मौज नाहीं.
रुक्मिणी :— इथँ आणलँ त्यांत जी मौज तीचआपण होऊन देण्यांत आहे. मग यापेक्षां दुसरी मौज काय आहे?
कृष्ण :— प्रिये, असँ नाहीं. जी शोधून काढिल तिलां हें मिळायाचँ. तूं नाहीं काढलँस तर भामा काढील
रुक्मिणी :— भामेस द्यावयाचँ आहे तर मग त्याचा लोभ मीं कां करावा? नकोच तर मला.
कृष्ण :— सखे, तुला द्यावँ असँ मनांत आलँ म्हणून इथँ घेऊन आलों. नाहीं पेक्षां प्रथमच भामेच्या मंदिरीं नेतों असतों.
रुक्मिणी :— बोलणँ जर ऐकिलँ तर खरँ असँवाटतँ पण मला शोधून काढतां न आलँ तर मला कसँ सांपडेल?
कृष्ण :— शोधून न मिळालँ तरी तुलाच देईन मग तर झालँ?
रुक्मिणी :— मग एरवींच द्यावँ. शोधून न मिळाल्यास हंसून द्यायाचँ तें आधींच दिलँ म्हणून काय झालँ?

कृष्णा :— छिः, अशांत कांहीं मौज नाहीं. तूं शोधूनघे.
रुक्मिणी :— इतकी हौस आली आहे! तर मग म-
ला नाहीं सांपडलें तरी शोधून काढत्यें. पण जर सां
पडलें तर तें वस्तु काय आहे.
कृष्णा :— पुष्प आहे, परंतु तें करंड्यांत आहे, चु-
रणार नाहीं. तूं शोधून घे म्हणजे झालें.
दासी :—आई साहेब मौज झाली आहे. शोधूनका
ढल्या वांचून राहूंनये. मग आम्हीं हंसूं.
रुक्मिणी :—हंसल्यात म्हणून कांहीं लाज नाहीं; प-
हात्यें इथें पैज भोगून हें सांपडणार नाहीं. द्यायाचें
मनांत आहे तर माझा हात लागलाकिं तितकेंच नि
मित्त पुरणार आहे. आग्रह धरला म्हणून निर्लज्ज हो-
ऊन पहात्यें आहें. (असें म्हणून पीतांबरांत तिणें अ
चूक धरिलें. आणि म्हणते सांपडलेंस लबाडा! दासी
आतां कसें झालें, जिंकलें किं नाहीं?
दासीः— जिंकलें यांत संशय नाहीं. परंतु प्रीतिअ-
सल्यामुळें आपल्याकडून जिंकून घेतलें हें खचित.
रुक्मिणीः— तें खरेंच आहे. त्या विषयीं माझेंबो
लणें आहे. पण मीं पूर्वींचि सांगितलें किं नाहीं, पै-
ज भोगून पहा येणार नाहीं असें. तें हेंच, असो,
हें मिळालें कुठून हें ऐकुंया!
कृष्णाः— प्रियेग, हें फूल नारदांनी मला दिलें तें तु
ला द्यावें म्हणून इथें आणलें. हें घे.
रुक्मिणीः— प्राणनाथ, कसचें बरें फूल हें? अहा-
हा! काय वासतरी! जन्मांत असला वास अनुभ-

विला नाहीं.

कृष्णा:—हे सुंदरी, हें पारिजात वृक्षाचें फूल आहे. हें नारदांची पूजा करितांना पूजेंत इंद्रानें समर्पण केलें. तें त्यांनीं मला दिलें

रुक्मिणी:— सख्या, माझी विज्ञापना आहे ऐकावी.

कृष्णा:— सांग कायतें ऐकतों.

रुक्मिणी:— जसें ममतेनें पुष्प इथें आणलें तसें च ममतेनें आपल्या हातानें वेणींत माळावें. हें एक मागणें आहे.

कृष्णा:— बरें आहे. (असें म्हणून आपण तिच्या वेणींत तें माळून.) सखे आतां मला काय? होतें तें फूल तुला देऊन मोकळा झालों.

रुक्मिणी:— आपलें सर्वच आहे. (कृष्णाच्या कंठास आलिंगन देऊन.) ही मी अलंकारा सह वर्तमान आपलीच आहे. ही काय वाईट.

कृष्णा:—अग, (चुंबन घेऊन.) तुला वाईट असें कोण म्हणेल? श्लोक. ॥ आर्यमुक्ताफलमबले त्वमधरकांत्यातुविद्रुमंकुरुषे ॥ दृष्ट्यागुंजीभूतंशिवशिवहसितेनमौक्तिकंभूयात् ॥१॥ हे चारुगात्री चंद्राला लाजविणारा असा हा तुझा मुखचंद्र पाहून माझे नेत्रच कोर सुखी होतात. तुझा अधरोष्ट तर जसें बिंबकाफल म्हणजे पिकलेलें तोंडलें असावें तसा लाल आहे. तेणें करून नासिकेंतील मौक्तिक पोंवळेंच किं काय अशी भ्रांति होते. नासिका तर जशी राव्याची चोंच असावी तशी शोभत आहे. दंतपंक्ति जशा हिरकण्या

असाल्या तशा शुभ्र आहेत. अधरोष्ठाची प्रभा फांकून पोंवळ्या सारखें भासणारें जें मौक्तिक त्याचीओळख हास्य होण्या बरोबर दंतांची प्रभा चंद्रप्रभे प्रमाणें निघून अधरोष्ठाच्या प्रभेस छपविते तेव्हां हें मौक्तिक आहे असें दिसून येतें. नाहीं पेक्षां अधरप्रभेनें पोंवळें आणि वरच्या बाजूनें नेत्रांची नीलवर्ण प्रभा फांकून गुंजा नासिकेंत कशासाठीं ठेविली आहे असा संशय येतो. ज्यावेळीं दंतप्रभेचा उदय व्हावा त्यावेळीं वरचा नीलिमा व खालचा लालिमा खालीं छपला जाऊन मध्यें दंतप्रभा असल्यामुळे हें मौक्तिक आहे असंवाटतें. असें निरूपम तुझें सौंदर्य पाहण्या बराबर कामज्वर सर्व देहभर प्रदीप्त होऊन अधरामृत पानाची उत्कंठा उत्पन्न करितो. हे सर्वे निद्रा केल्या वांचून श्रमाचा परिहार होत नाहीं म्हणून निद्राकरणार.

रुक्मिणीः— बरें आहे. (पडदा पडतो.)

प्रवेशतिसरा.

पात्रें.

सत्यभामा, दासी, चित्रांगी.

सत्यभामाः— अग चित्रांगी? सद्या काल घरीं जाण्यासाठीं निरोप मागत होता. त्यास इकडे बलावून आण? (चित्रांगीनें त्यास आणल्यावर.) सद्या, तुला घरीं जाण्यास निरोप आहे. परंतु चार दिवसांनींआलें पाहिजे समजलास? चल तूं आतां.

सद्या:— आज्ञे प्रमाणें चार दिवसांनीं येतों. (असें म्हणून जातो.)

सत्यभामा:— चित्रांगी? आज चित्ताची वृत्ति कशी उदास झाली आहे. काय बरें असें हें! मन कारणावांचून खिन्न होतें हें चिन्ह बरेंच असें दिसत नाहीं.

चित्रांगी:— निजून उठलां अहां यामुळें कांहीं आळस येतो. यांत कांहीं अशुभ असें मानूंनये. सर्व अशुभ जळो आणि मंगळ प्राप्ति त्या अम्बेच्या कृपेनें होऊ. शांतंपापं! शांतंपापं

सत्यभामा:—तरी एक त्या अंबेच्या कृपेनें नीट आहे. काय म्हणशील तर पुष्कळ स्त्रिया असून प्राणनाथाची कृपा अव्यंग मजवर आहे. पुष्कळ स्त्रिया जिथें असतात तिथें हेंच दुर्लभ असतें. (इतक्यांत नारदमुनी बाहेर आले. पुढें जाऊन नारदास आंत आणून उच्चासन देऊन पूजा करून विचारते.) मुनिराज, कुणीकडून अकस्मात येणें झालें. आपल्या आगमनानें मी धन्य झाले. आनंद झाला. आतां कायती आपण आपली सेवा सांगावी.

नारद:— सत्यभामे, सहज द्वारका पहावी, कृष्णाची भेट घ्यावी, आणि जावें म्हणून आलों होतों.

सत्यभामा:—भेट घेतलीच असेल नाहीं?

नारद:—भेट घेतली, पूजा घेतली, व तुला भेटूनजावें असें वाटलें म्हणून इकडे आलों.

सत्यभामा:—असो; ठीक आहे. हा माझ्यावर अनुग्रहच झाला. जशी आज्ञा कराल तसें करीन.

नारद :— सत्यभामे, कृष्णाच्या स्त्रिया व त्यांचीं मंदिरें पाहून व त्यांची कृष्णाचे ठायीं प्रीति पाहून व कृष्णाचीं त्यांचे ठिकाणीं प्रीति कशी किती आहे हें पाहून आलों. जातांना म्हटलें तुला भेटावें.

सत्यभामा :—मग महाराज, प्रीति कुणाच्या ठिकाणीं किती आहे हें पाहिलेंच आहे. तर सर्वांत अधिक प्रीति कुणावर बरें आहे, असें आपल्यास दिसलें ?

नारद :— तुला कुणावर आहे असें दिसतें तें सांगबरें ?

सत्यभामा :—माझ्यावर आहे असें वाटतें. आपल्यास कसें दिसतें ?

नारद :—असेल असें म्हणत्येस पण आहेच असा कांहीं तुझाही निश्चय नाहीं.

सत्यभामा :—आहेच. मग बोलायला कशालापाहिजे. सिद्धच आहे हें !

नारद :—भामे ऐक. मी आज पारिजात वृक्षाचें पुष्प, मला इंद्रानें पूजेंत समर्पिलेलें आणलें होतें, इथें आल्यावर कृष्णानें माझी पूजा केली, आगतस्वागत केलें, मग तें पुष्प मी कृष्णास दिलें होतें.

सत्यभामा :—मग आज खचीत तें फूल मला मिळेल. मग तर कुणावर प्रीति आहे हें दिसून येईल.

नारद :—भामे तूं वेडी आहेस, असें दिसतें. अग आपल्या प्रमाणें सर्व जग दिसतें असें म्हणतात. तें कांहीं खोटें नव्हे. एकंदरींत स्त्रिया म्हटल्या म्हणजे

भोळसर असतात. आणि एक वस्तू कुणाला म्हणून त्यानें द्यावी; सहस्त्रावधि स्त्रिया !

सत्यभामाः—अहो, स्त्रिया सहस्त्रावधि जरी असल्या तरी फूल एकच आहे. तेव्हां जी अत्यंत आवडती तिला तें मिळावें. यावरून मला मिळेलअसें वाटतें.

नारदः—तूं अत्यंत आवडती म्हणून तुला मिळावें ना?

सत्यभामाः—होय, मग?

नारदः—तूं पाहिजे तसें म्हण. मीं तर असें म्हणतों कीं, जिला हें फूल मिळेल ती अत्यंत आवडती. त्याप्रमाणें जी आवडती होती तिला तें मिळालें.

सत्यभा०—महाराज, कुणाला बरें मिळालें?

नारदः—तें फूल रुक्मिणीला मिळालें. ती सर्व स्त्रियांत कृष्णाची आवडती. तूं मात्र आपण आवडती म्हणून मुरडत्येस तें फुकट आहे!

सत्यभामाः—महाराज, आजपर्यंत विशेष प्रीति माझ्यावर आहे असें मानीत होत्यें तें फुकट झालें ना! बोलतांना तर अगदीं खात्री करून द्यायाची होते; आणि असें करायाचें. बरें देवा? बायकांचें मन अगदीं वेडें आहे! आपण मात्र विश्वास ठेवावा, आणि फसावें.! पुरे कृष्णाची प्रीति. आतांच प्राण जातील तरबरें!

नारदः—बरें, आतां मी येतों बैस.

सत्यभामाः—(श्वास दीर्घ टाकून.) महाराज,आ

पण आलां म्हणून मी विश्वास कृष्णावर ठेविला तो फुकट असें पुरें समजून आलें. बरें यावंतर नमस्कार करित्यें. (दासीस म्हणते.) पाहिलें चित्रांगी? असें आहे! कितीही दोष असले तरी भाषण जर मधूर आहे तर तेव्हढ्या गुणानें ते सर्व दोष छपून जातात. मी जी अशी फसलें ती मधूर भाषणानें फसलें एको गुणःखलुनिहंतिसमस्तदोषान् एकच चांगला गुण संपूर्ण दोषांस नाहिंसा करितो. जसा सूर्य उदित होऊन आपल्या तेजानें सर्व पदार्थ दाखवितो, पण त्याच तेजानें तारांगणास छपवितो. तात्पर्य. मधूर भाषण जर आहे तर बाकी दोष असलेलेसमजत नाहींत. श्लोक. ॥ पिकस्तावत्कृष्णःस्वयमरुणयापश्यतिदृशापरापत्यद्वेषीस्वसुतमपिनोपालयतियः ॥ अथाप्येषोभीषांसकलजगतांवल्लभतमो, नदोषागम्यंतेखलुमधुरवाचांक्वचिदपि ॥ १ ॥ अग, कोकिल व काक हे दोनही एकच आहेत काकच चांगला असें म्हटलें तरी चालेल. पहा, जसा कावळा कृष्णवर्ण आहे, तसा कोकिलही काळाच आहे. कावळ्याचे व कोकिलाचे नेत्र जर पाहिले तर कोकिलाचे कावळ्याही पेक्षां अधिक लाल आहेत. कावळा दुसऱ्याच्या पोरांचें बरें पहात नाहीं, तसाचको किल दुसऱ्याच्या पोरांचें बरें पहात नाहीं. इतकेंच नव्हे तर आपल्या सुध्दां पोरांचें संरक्षण तो करीतनाहीं. तें कावळ्यानें करावयाचें. तथापि सर्व लोकांस कोकिल फार आवडतो. कारण मधूर बोलतो.

एवढाच गुण त्याच्या ठिकाणीं आहे. तो गुण कावळ्या चे ठिकाणीं नाहीं. या मधुर भाषणामुळें मीं जो विश्वास ठेविला तो व्यर्थ झाला. (असें म्हणून रागानें दीर्घ श्वास सोडीत सोडीत सर्व अलंकार काढून फेंकून देऊन आपण जमिनीवर पडली. इकडे कृष्णास निद्रा लागल्या नंतर रुक्मिण आपल्या मंदिरांतून नित्या प्रमाणें भामेच्या मंदिरीं आली. जवळ आली तों दरवाजा उघडाच आहे असें पाहून.)

रुक्मिणी:—हें कायग, कोणग दरवाजावर आहे चित्रांगी?

चित्रांगी:—जी बाईसाहेब, ही मी आहें.

रुक्मिणी:—अग, दरवाजा उघडा कां?

चित्रांगी:— नाहिं सरकार! (पुढें येऊन)ही मी जागी आहें. आणि इथें उजेडास बसून हार ओंवीतआहें.

रुक्मिणी:—(आंत येऊन.) हेंग काय! ही तुमची स्वामिणी आज जमिनीवर कां लोळत पडली आहे?

चित्रांगी:—(आसन देऊन व विड्यांचे तबक आसना जवळ ठेवून.) बसावें आईसाहेबानीं.

रुक्मिणी:—थांबग, येत्यें. ठेव एव्हां तिथें तबक. (भामे जवळ जाऊन.) कायग हें आज असें? इतका वेळ मला येऊन झाला तर या बसा असें म्हणावयाचीं रोजची रीत टाकलीस? निद्रा लागली- असें म्हणावें तर पलंग टाकलास, अलंकार टाकलेस. हें काय? हें काय आहे समजत नाही! का-

यग हें असँ चित्रांगी? ही तुझी स्वामिणी हिची अ-शी दशा काय निमित्यानें झाली? हें पाहूं. तुला माहीत आहे?

उलूपीः— नाहिं सरकार!

रुक्मिणीः— कायग हें! तूं इथँ असत्येस आणि तुला ठाऊक नाहीं? ठीक. अशीच चाकरी करत्येसना? हें तुला ठाऊक नाहीं तर कुणास विचारावँ बरँ? सद्या कुठँ आहे?

उलूपीः— परवां निरोप घेऊन चारदिवस घरीं गेला आहे.

रुक्मिणीः— केव्हां पासून हिची अशी अवस्थाजाहली आहे हें तरी सांगशील?

उलूपीः— आई मघां नारदमुनी इथँ आले होते.

रुक्मिणीः— होय, असं ऐ किलँ खरँ. पुढें.

उलूपीः— त्यांची पूजा केली, आगत स्वागतझालँ, मग कांहीं गोष्टि चालल्या होत्या. मग मुनिजाबयास गेले. तेव्हां सर्व प्रकृति नीट होती. कशावरून मुनी गेले तेव्हांमी इथँच होतें. विडा करून दिला, पिकदाणी पुढें ठेवून हातांत पंखा घेऊन वारा घालीत जवळ उभी होत्यें. तर रोजच्यासारखँ बोलणँ चाललँ (हातावर हात चोळवून) रामकृष्ण गोविंद. कांहीं नाहीं. दासीनें काय केलँ. काय करायाचँ कांहींच चौकशी नाहीं. पाहिजे तसँ वागावँ असा रागतरी कुणावर आहे नकळे!

रुक्मिणीः— गोष्टी तरी काय काय झाल्या सांगपा

हू?

उलपी:—जी, मी तशा कांहीं ऐकिल्या नाहींत. चाकरीच्या उद्योगांत होतें. पूजा सुद्धां नीट पाहिली नाहीं सरकार, मग अमुक गोष्टी झाल्या हें सांगतां कसें येईल?

रुक्मिणी:— नारद आले होते म्हणून प्राणनाथ सांगत होते खरे. म्हणजे त्यांनीं दिलेलें एक पुष्प फार सुगंधी होतें. तें घेऊन माझे महालीं येणें झालें होतें.

उलपी:—हां, अशाच कांहीं गोष्टी चालल्या होत्या. म्हणजे पारिजातकाचें पुष्प मी कृष्णास दिलें असें मुनि बोलत होते. मी त्या गोष्टी पुरसतीनें ऐकिल्या नाहींत. आपल्या कामांत होत्यें.

रुक्मिणी:— बरें नारद जाण्या बराबर असीस्थिति झाली आहे किं कांहीं मध्यें काळ गेलाहोता

उलपी:—नाहीं तशीच अशी स्थिति झाली आहे. कारण काय असेल तें समजत नाहीं.

रुक्मिणी:— तर मग मला तें पुष्प दिलें म्हणून इला वाईट वाटलें असेल. म्हणजे ती गोष्ट नारदाच्या मुखानें इणें नीट ऐकिली किं नाहीं आणि लागलाच राग आहे. एरवीं कुणाचा राग असतातर वस्त्रालंकार काढून टाकिती नसती. वस्त्रालंकार जेव्हां टाकिले तेव्हां नवऱ्यावर रागआहे असें दिसतें. नवऱ्यावर रुसायाचें कारण हें अमोलिक पुष्प मला दिलें आपल्यास दिलें ना-

हीं हेंच असेल. यां वांचून दुसरा तर्क निघत नाहीं.

चित्रांगी:—तिकडे रुसावा मात्र असेल खरा. म्हणजे मी मात्र माझ्यावर पूर्ण मर्जी आहे असें भाषणाचें माधुर्य ऐकून आज पर्यंत मानीत होतें तें व्यर्थ झालें असें आई साहेब माझ्याजवळ बोलत होत्या. परंतु तेंच रुसाव्याचें कारण असें कशावरून समजावें? अलंकार टाकिले यावरून आपण आतां तर्क केला तो खरा असावा.

रुक्मिणी:— एकूण मला पुष्प मिळालें तें हिला खपलें नाहीं. म्हणतात तें खरें आहे. एकाचें सूख पाहून दुसऱ्यास म्हणजे सुखच होतें असा कांहीं सर्वत्रनियम नाहीं. पहा, सूर्याच्या उदयानें सर्वांसआनंद होतो, पण घुबडांस दुःखच. तसेंच चंद्राच्याउदयानें सर्व लोकांचा संताप दूर होतो, पण चोरांस त्यानेंच संताप होतो. तसें मला पुष्प मिळाल्यानें सुख झालें, पण इला दुःखच झालें आहे. असे मत्सरग्रस्थ जे आहेत ते दुसऱ्यास सुख झालें म्हणजे त्यानेंच मनांतल्या मनांत जळजळून मरणार त्यास कुणी काय करावें? (असें भाषण ऐकून सत्य-भामा चवताळून.)

सत्यभामा:—कोणग ही टवळी, विनाकारण कां दुःखावर डाग देतआहे! मघांपासून कोणा मेलीसवंत मीच शहाणी म्हणून मुरडत आहे. माझे कान तर हे शब्द ऐकून किटून गेलेआहेत. (कानावरहात घेऊन) शिव शिव माझें मन अगदीं विटलें बा-

ई हे अमंगळ शब्द ऐकून! ही कोणती घाणेरे शब्द जर न बोलेल तर फार चांगलें!

रुक्मिणीः— अग सवती? आतां सवत असें जेव्हां तूं मानलेंस तेव्हां आतां मात्र मी तुला सवतच म्हणत्यें. माझें मन आजवर जसें तुझ्या विषयीं निर्मल होतें तसें अद्यापिहि आहे. आणि इतके दिवस जशी बोलत होत्यें, तशी आजही बोलल्यें. तुझ्या मनाला मात्र आज कांहीं विकार झाला आहे. म्हणून ज्याला पित्त झालें असेल त्याला साखरही कडू लागते. ती साखर रोजच्या प्रमाणेंच गोड असत्ये. ती कांहीं कडू व्हावयास नको. तोंडाची रुचि मात्र जाते. तसें माझें भाषण रोजच्या प्रमाणेंच आहे. तुझ्या मनाला मात्र आवड नाहिंआहे. म्हणून वाईट!

सत्यभामाः— वः! कायपण मधूर शब्द बोलत आहे! जशी काय मैनाच! तूं आपली अवडती, तशीच सुंदर! तेव्हां आपण आपलें फूलमाळावें; आणि तें देणारा जवळ मुरडत बसावें! माझ्याशीं कां आणिजळफळ मांडला आहेस?

रुक्मिणीः— अग टवळे, मी जळफळत नाहीं? जळफळ सर्व तुझ्या मागें लागली आहे. शुद्धअवदसे प्रमाणें जमिनीवर लोळत पडली आहेस. आधिं मी तुझा स्वभाव थोडथोडा ओळखलाच आहे. मग इथें यावें कां? बरें बैस आतां. येत्यें, (असें म्हणून रागानें जातें असें पाहून.)

सत्यभामाः—जा. जापरती एकदां! जाशील तर मजवर मोठी मेहरबानी होईल. अग चित्रांगी? विषय लंपट होऊन जिणें आपल्या भावाचीहि फजितिकरावयास सोडिली नाहीं. ती मला कसें सूख देईल? हिची कथा सांगतों ऐक. हिचा मोठा भाऊ रूक्मि, त्याच्या मनांत इला शिशुपाळास द्यावी असें होतें. त्या प्रमाणें तो शिशुपाळ सेनेसहवर्तमान जरासंध, शाल्व, दंतवक्त्र, विदूरथ, असे बरावर योध्ये घेऊन विवाहास आला. इतक्यांत इणें स्वतंत्रपणें कागद लिहून ब्राम्हणा जवळ देऊन ब्राम्हणास इकडे द्वारकेंत पाठविला. म्हणून इकडून मुद्दाम जाऊन राक्षस विधीनें तितक्याही योध्यांस जिंकून इला आणावयाची खटपट घेतली. अशा सुंदर पुष्कळ होत्या. पण स्वतंत्र नव्हत्या. पुढें तें इच्या भावास मानलें नाहीं. तो युध्दास आला. मग इच्या साठीं जो त्याचा अपमान यांनीं केला तो सांगतां येत नाहीं. म्हणजे खड्गानें त्याची मिशी उतरली. शेवटीं त्यानें तोंड पुन्हां आपल्या देशास दाखविलें नाहीं! मध्येंच उद्विग्न होऊन राहिला. अशी त्याची चांगली भाऊबिजेची कुरवंडी करून पूर्व जन्मीचा डावा उगवून आतां माझा डावा उगविण्या साठीं सवत झाली. (असें भाषण ऐकून रुक्मिण मागें फिरून.)

रुक्मिणीः—अग तुला म्हणवें तरी काय? मी विषय लंपट होऊन जो पुरुष वरला तोच पुरुष आपण व

रून मुद्दाम माझा डावा साधलास, आणि सवत झा- लीस. बरें मी जी आवडती झाल्यें याचें कारण काय? आपण होऊन दुसऱ्याची गरज न धरितां श्रीकृष्णास अनुसरल्यें म्हणून तेहि आपण होऊन माझ्यावर प्री ति करितात. व माझ्या आईबापांच्या व रुक्म्या वां- चून सर्व भावंडांच्या मनांत मला याच पुरुषास द्याव याचें होतें. म्हणून दुसरा पुरुष मला मुळींच आवड- ला नाहीं. यांत मोठें लांछन कसचें पाहिलेंस? दा- दानें उगाच यांच्या बरोबर झगडा करून आपलाअ पमान करून घेतला. त्यास कारण मी कशी तें सां ग पाहुं? क्षत्रियांस स्वयंवर म्हणजे बहुमान्य आ- हे. म्हणजे आपण होऊन नवरीनें नवरा ज्यांत वर- ला जातो त्याचेंच नांव स्वयंवर. त्या प्रमाणें व स र्वांच्या अभिप्राया प्रमाणें मी वागत असतां उगाच त्यानें आपली फजिती आपल्या हातानें करून घे तली कां? त्या फजितीस तोच कारण. बापाच्या अभिप्रायास सोडून वागला मग अग टवळे त्या- चें कल्याण कसें व्हावें? तूं मूर्ख म्हणून मी त्याचे फजितीस कारण असें म्हणत्येस. आज मला फू- ल दिलें तें तुझ्यानें पाहवेना! ती (बोटें मोडून.) डाळे तरी फोडून घे. मी आपण होऊन जशी इकडे प्रीति ठेविली आहे, तशीच इकडून स्वाभाविक मा- झ्यावर प्रीति केली जाते; हयगई करितां येत ना- हीं. तशीच यांनीं तुझ्यावर प्रीति ठेविली आहे. पण तूं कुड्यामनाची म्हणून कांहीं तरी दोष आपल्या

स्वभावाचा त्या प्रीतीस लावून तिला कलंकित करते-
स म्हणून तिचा धर्म जो एक तोच खरा. श्लोक.
॥ येनोदकेनकर्दलीचंपकमाल्यादयोनिवर्धते॥ मुलकः
पलांडुलशुनातेनैवतेसुगंधदुर्गंधः ॥ १॥ ज्या उदकानें के
ळ, चांफा, माली आदिकरून वनस्पति वाढतात त्या
च उदकानें मुळे, कांदे, लसूण, हेहि जिन्नस वाढतात.
ते पूर्वींचे वंद्य जिन्नस तेहि रस, गंध, यांनीं निरनिराळे
व मुळे आदिकरून निंद्य जिन्नस हे त्याच्याहून वि-
रुध्द असून आपापल्यांतही रस, गंध, यांनीं निरनि
राळे म्हणून हे जे रस व गंध अनेक प्रकारचे झाले
त्यांस पाणी कांहीं अनेक प्रकारचें लावावें लागलें
नाहीं. तर पाण्याच्या आंगीं एकच प्रकारचा गुणअ
सून त्या उत्पन्न झालेल्या जिनसांनीं अनेक गुणदा
खविले जातात. तूं आपल्या ठिकाणीं असलेली प-
तीची एकसारखी प्रीति आपल्या संसर्गानें गढूळ
करित्येस. हें त्या पदार्थांनीं आपल्या संसर्गानें पा
ण्याचे गुण आपल्या सारखे अनेक करून दाखवि
ल्या प्रमाणें आहे. जें पाणी उंसाच्या मुळांत जातें
तें गोड लागतें, काजऱ्याच्या मुळांत जातें तें कडु
लागतें, मिरचीच्या मुळांत गेलें तें तिखट, चिंचे-
च्या मुळांत गेलें तें आंबट लागतें असें नाहीं. परं-
तु इतक्या रुच्या या पदार्थांच्या समागमानें झाल्या
पाण्याची एकच आहे. तात्पर्य. तुझ्या ठिकाणींके
लेली प्रीति सर्पास पाजलेल्या दुधा प्रमाणें विषरू
प परिणाम देणारी झाली. राणीं दासीनें कथास का-

डून टाकायास पाहिजे होते. तसाच पलंग कां टाकतीस? माझ्या बराबर मत्सर कां धरती अस्तीस? प्रीतिच विषरूप झाली! अशी माझ्यावर केलेली प्रीति कुठें विषरूप झाली आहे?

सत्यभामा:— अग सवती, तूं पण इतकी हुजत का माझ्या बराबर मांडिली आहेस? आतां कृपा करून नबोलतां आपल्या घरीं निघून जाशील तर माझ्यावर कृपा होईल! कसें करत्येस?

रुक्मिणी:—मी रोजच्या प्रमाणें आल्यें, बोलल्यें, नाहिंआवडत तर जात होत्यें. पण मलाही नसता दोष लावून जेंव्हां आपला थोरपणा दाखवूं लागलीस तेंव्हा तसें बोलणें भाग आलें. रुक्म्याच्या फजितीस मीच कारण असें बोललीस तो आपला कुळधर्म संभाळावा म्हणून बोललीस भलताचखोटा आरोप कुणावर तरी घ्यावा हा तुमचा महाधर्म. तुझ्या बापानें नाहिंका स्यमंतक मणि इकडे यांनींच चोरून नेला असें ठरविलें होतें? कोणावर काय आरोप घेतला तर शोभेल हा गव्हारानें विचार केला होताकाय? जांबवान् नामक अस्वल, त्याच्या बरोबर चोवीस दिवस युध्द करून त्यास जिंकून, एक कन्या आणि तो मणी आणून तुझ्या बापाच्या म्हणजे सत्राजिताच्या स्वाधीन करून कुठें कसा हा पोंचला, हें कान उघडून सांगितलें, आणि मग स्वस्थ झाले. असें त्यांनींम्हणूनच तें लांछन पराक्रम असल्यामुळें धुतलें.

तुझ्या बापाची जिकडे तिकडे सर्व लोक निंदा करूं लागले! कीं अशा थोर मनुष्यावर खोटा आरोप घेतलास! अशी निंदा ऐकून तोंड दाखवायास जागा नाहिंसा झाला. आणि माझी सवत तरी होण्यास कारण तेंच. पश्चात्ताप झाला, सर्व निंदूं लागले,--त्यावेळीं कृष्णाच्या मनांतला दंश कसा घालवावा अशी तुझ्या बापानें चिंता धरिली. आणि तो मणि व हें (तिच्या तोंडाकडे बोट दाखवून.) रत्न, दोन्ही कृष्णास अर्पण करून प्रसन्नता करून घ्यावी असें योजून हीं रत्नें शेल्यास बांधिलीं. एरवीं मागण्या कांहीं केल्या नव्हत्या. काय तूं आपण होऊन स्वयंवर विधीनें माळ घातली नव्हतीस. तुझ्या बापाचे मनोरथ पुरविण्यासाठीं तुझा अंगिकार केला. आणि माझ्यावर केलेली प्रीति पाहून दुष्ट स्वभावामुळें द्वेष करत्येस? तूं कायकरिशील स्वभावच दुष्ट! ही मी जात्येंहां? तूं एकदां सुखी हो म्हणजे झालें!

सत्यभामाः— जाईसना पण! जात्यें जात्यें मात्र म्हणत्येस! जा, एकदां आपल्या नवऱ्या जवळ जाऊन आपलें सौंदर्य आणि शहाणपण दाखवीव. तुझ्याच अधरांवर काय अमृत आहे तें घेऊन तृप्ति होऊंदे, म्हणजे झाल्यें. इकडे मी मेल्यें तरी ढुंकून सुध्दां पाहू नको. असा आपल्या माणसांख्यास निरोप सांग?

रुक्मिणीः— जायास काय वेळ लागतो? मी आवडती हें तुज कां सोसत नाहीं? मी आवडती झाल्यें तर त्यांची. तुझीतर नव्हेना? मग कां? (जाऊं लागते.)

सत्यभामाः—जाग, मी आपली वाईट! तुला खोटीची संगत कशास पाहिजे? तूं आपली चांगली असें आपणाच मानून घे. आपला दोष दिसत नाहीं. कायसें म्हणतात ना. दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ दिसतें पण आपल्या डोळ्यांतील मुसळ दिसत नाहीं! तें खरेंच ग खरेंच. (रुक्मिण आइकलें, नाहीं, असें करून जाऊं लागते असें पाहून.) सत्यभामा बोटें मोडीत दरवाजा पर्यंतजाते. नाहीं आतां पुरे तुझा सहवास. (इतक्यांत रुक्मिण मागें पाहते, आणि.)

रुक्मिणीः— येत्येंग आतां, बैस. तूं मागून कशास येत्येस!

सत्यभामाः— नाहीं; पोंचवायास आल्यें होत्यें चार पावलें!

रुक्मिणः—(बोट्या मोडून.) कायग सवती सन्मान करण्याची आवड धरिलीस ही! (ओंठ चांवते) घे आपली हौस पुरवून! आणि तृप्त हो बरें!

सत्यभामाः— चित्रांगी पहा बरें, मला फूल मिळेल अशा आशेनें होत्यें. पण कसं केलंतें तुम्हीं ऐकिलें ना? आतां काय करावें! आतां एवढा राग आला आहे. पण एक शब्द बोलून माझा राग कु-

णीकडे नेतील तो पहाह्या. आतां इथें यायाचा समय आहे.. मी तर अगदीं बोला याचीच नाहीं. (इकडे कृष्ण जागे होण्यापूर्वी रुक्मिणी आपल्या हालीं आली. कृष्णानीं मुख क्षालन करून रुक्मिणीनें दिलेला विडा घेतला, आणि तिला सांगून भामेच्या मंदिरीं आले. मंदिराचें दार उघडें आहे असें पाहून.)

कृष्णः— कायग आज असं? हिची अशी काय दशा ही!

चित्रांगीः— महाराज, प्रकृति नीट नाहीं.

कृष्णः— प्रिये, सत्यभामे काय बरं झालं आज हें! मला असं वाटतं तुझ्या चित्ताला आज समाधान नाहीं आहे, कारण दागिन्याचा वीट एरवीं येता नसता. दागिन्याचा आला तरी पलंगाचा येता नसता. प्रकृति नीट नसली तर जशी मृदुशय्या असेल तशी अधिक आवडते. आणि तुला तर मृदुशय्येचा कंटाळा इतका आला आहे आणि भूमिच्याच ठिकाणीं अधिक आवड धरिली आहेस. या वरून मनालाच चैन नाहीं असं वाटतं. तर तुला खेद होण्याचें कारण काय? तें ऐकण्या विषयीं उत्कंठित झालों आहे सांग पाहूं? (कांहींच बोलत नाहीं असं पाहून जवळ जाऊन हनुवटीस धरून.) जर इतकं दुःख तुला कुणापासून झालं आहे हें समजेल तर त्याला दंड करून तुला सुखी करीन. कोणावर रुसली आहेस हें प्रिये तूं जर सांगितलंस तर नीट समजायाचं. तूं जर बोलत नाहीस तर कसं

समजावं? तूं हे उष्णश्वास जसे शुध्द सर्पानें सोडावे, असे क्रोधानें सोडित आहेस. तेणें करून हा तुझा प्रियकांत अगदीं होरपळून जात आहे. आज पर्यंत यास किंचित् त्रास झाला असतां तूं स्वतः आपल्या हातानें वारा घालीत होतीस. ती तूं मी केलेली विनवणी क्रोधाच्या श्वास वायू कडून उडवून टाकितीस. ज्याच्या वियोगानें एक क्षण तुला कल्पासमान वाटत असे त्याच्या विनवणी कडेस लक्ष देत नाहींस हें काय बरें? आज मी तुझी नित्याचीचाकरी गणूक लक्षांत आणून खिन्न व्हावें हें तुला योग्य दिसतें ना? बरें सांगतरी पाहुं तुला कोण दुःख देणारा तो? ज्या दुष्टानें तुला दुःख देऊन तुझी माझ्याविषयींची प्रीति नाहिंशी केली आहे तो तुझ्या पेक्षां माझा शत्रु आहे. तर त्याचं नांव मला सांगशील तर त्याला येथें तुझ्या जवळ शरण आणिन. तो कडू शब्दानें जर तुला बोलला असेल तर त्याची जिव्हा छेदीन. वक्र दृष्टीनें जर त्यानें तुला पाहिलें असेल तर त्याचे नेत्र काढीन यांत बिलकूलसंशय धरूं नको. परंतु त्याचं नांव मात्र सांग. मला असें दिसतें कीं, त्याच्या कडून तुझं अप्रिय झालें म्हणून रुसलीस नाहिंतर माझ्याशीं तुझं रहस्य असलं म्हणजे मला फार सुख होत असतं. तें त्या माझ्या शत्रूनें डावा साधून मला नाहिंसें केलें. आणि मला फार दुःख दिलं म्हणून माझ्या कैवारानें माझ्या दुष्टावर राग केला आहेस असं वाटतं. अ-

सें तरी खचित असेल तर माझ्यावर फार प्रीतिआ हे असं ठरतं. आणि मी तुझ्या मुखांतील एक तरी मधुर शब्द ऐकावा म्हणून इतका उत्कंठित झालों असतां तुझा शब्द मला इतका दुर्लभ झाला. त्यावरून तेंहि माझें म्हणणें मला परत मागं घ्याव याचं आलं. हें तुला पतकरतें ना? बरं ज्या दुष्टानें माझा एवढा डावा साधला आहे त्याला जर नाहिंसा केला नाहीं तर माझं मुखावलोकन सुध्दां तूं करूं नको. हा तुझा शत्रू असें असून तुझ्या पेक्षां माझा शत्रू आहे तर आम्हीं दोघेंही एकोप्यानें वागून त्या दुष्टाचा नाश करूं. पण बोललं पाहिजे एवढीच तुझ्याकडून मदत झाली म्हणजे पुरे. मला त्याचं नांव मात्र समजलं पाहिजे. तें तूं बोलल्या वांचून समजणार नाहीं. (पुन्हा हनुवटीस धरतात. ती हात आपल्या हातानें दूर करितें.) तुझ्यापासून मला जर सुख नाहीं तर त्रैलोक्य मला असूननसून शून्य दिसत आहे. रोज मी येतांच तुलाआनंद होऊन तूं मधुर शब्द बोलून माझं अंतःकरणसुखी करीत होतीस. त्यावेळीं तुझ्या कंठ रवा पुढें हे मंजुभाषिणी कोकिलांच्या शब्दांचा धिःकार करीत होतों. त्यांला आज आल्हाद होऊन मला ते आज हंसत आहेत. (हनुवटीस धरून.) हे सुंदरी हा तुझा मुखचंद्र पाहून त्या चंद्रास' तूं कलंकीत आहेस. आणि हा प्रियेचा मुखचंद्र पहा निष्कलंक आहे असें बोलून लाजवीत होतों ती आज मा

झी फजिती होत आहे. तसंच तुझी प्रेमदृष्टि रोज मी येतांच तूं सामोरी येत होतीस त्यावेळीं, माझ्या वर होत असे त्यावेळीं त्या कटाक्षानें मोहित होऊ न हे मृगनयने! हरिणीस की हंसत होतों. हाय! हाय! जसं करावं तसंच भरावं! हे गजगामिनी! तूं जेव्हां सामोरी येत होतीस त्यावेळीं चरणांच्या ठि काणीं नुपुरादि अलंकार आहेत, व ते शब्द करीत आहेत, असं पाहून हंसी व हत्ती यांच्या गतीचा धिःकार करीत होतों. त्यांनींच हा डावा साधलाकीं काय नकळे! तुझ्या केश पाशां पुढें मयूर पिच्छां स तुच्छ मानीत होतों तो हा केशपाश विसकट लेला-पहावा असं काय बरं हें? या प्रमाणें ज्यांला ज्यांलाहंसत होतों त्यांना त्यांना आज आनंद होऊन मलाअसा खेद झाला असतां त्यांनीं हंसावं आणि मी रडावं असा दैवाधीन जाहलों. आणि इतकी तूं सुध्दांनिठुर झालीस तर मला प्राणाचं ओझं आहे. तर हें दुःख कुणास बरें सांगावं! तुझ्या मर्जी बाहेर मी कधींही चाललों नसतां जर राग धरलास तर रोजज्यांचा धिःकार करीत होतों ते हरीण, कोकिल, हंस, गज, मयूर, चंद्र हे मला शरण गेलों म्हणून जवळ धरितील? धरणार नाहींत. एकूण ते सर्व आज माझा सूड उगविणार, आणि तूंहि राग नकरणारी करत्येस तर त्रैलोक्यांत मला सुख कुणा पासून होणार आहे सांगबरें! इतका काकुळतीस मी आलों असून निष्ठुरपणाचा त्याग करीत नाहींस तर यापा

सून तुला तरी सुख होईल असा विचार केला आहे-स? पुढें काय सुख होईल तें होऊ; परंतु सध्या तर सुखोप भोगांचा त्याग केला आहेस! वेडे काय बरं हें! हें तुझं शरीर पुष्प शय्येवर राहणारं म्हणजे त्या पुष्प शय्येचा ठसा ज्याच्यावर उठावा तें हें सुकुमार शरीर क्रोधाचें कवच लेवूनच काय इतकें कठीण झालं! हायहाय!! आवडते, हें पाहून मला फार वाईट वाटतं! आणि तुला वाटत नाहीं कसं? (मुखावर हात फिरवून;) हें तुझं मुख म्लान झालं आहे! सूर्य किरणांनीं म्लान झालेल्या गुलाब पुष्पाप्रमाणें लाल झालं आहे! हे सखे? सर्व राग टाकून एक शब्द बोलशील अशी पूर्ण आशा आहे! टाकटाक बरं राग पाहू! सखे, या अधरोष्ट सुखाचालाभ दे? हे तुझे स्तन रागानें उन्नत झालेले आज असे मोकळे पडलेले आहेत! काय तरी निस्सिम राग हा! हे भामिनी? हे तुझे मुखावर छायेंतच पहाकिती घर्म बिंदु आले आहेत! इतका त्रास होण्यास कारण कायतें सांग? कसे दिसतात पहा हे. जशी मोत्यांचीच जाळी घातली असावी तसे दिसतात. (असेंपाहून आपल्या शेल्यानें तिचें मुख पुसून, जितकें बोललों तितकेंही जर तूं व्यर्थ घालविलेंस तर मी प्राण त्याग करावा इतकाच इलाज करावयाचा ठेविला आहे! तो आतां करावयाचा होणार! प्रिये, रागटाक आणि उठून एकवार मला आलिंगन देऊन आपली सर्व हकीकत सांग. कोणतेंही तुला दुःख असलें

तरी निवारण करीन.

सत्यभामाः—आहाहा! कायपण प्रीतीचा पूर आहे!! काय माधुरी भाषणास आलि आहे सांगु! सवतीनें आलिंगन दिलं नसेल तेव्हां माझी हतभाग्येची आठवण झाली! भ्रमरास कमळें मिळालीं नाहींत तर मग कुड्याचें फूल अत्यंत आवडतं! एरवीं कशास पाहिजे!

कृष्णाः— सुंदरी? कायबरँ लावून बोलतीस हें! तुली तरी हें योग्य दिसतं ना? असा अनादर कधिंकेला आहे तो सांग बरें? आधिं बोलतच नाहींस! तशांत रुसाव्याच्या अस्पष्ट शब्द. त्यानें कसा अभिप्राय समजावा? बरें, चित्रांगी? तुला इच्या रुसाव्याचँ कारण कायतें माहीत असेल तर सांग?

चित्रांगीः— जी. आई साहेबांची प्रकृति बिघडण्याचं कारण थोडंसं माहीत आहे, आज्ञा झाल्यास स्वामीचे चरणीं निवेदन करीन.

कृष्णाः—काय माहित आहे सांग पाहूं?

चित्रांगीः—अजि महाराज! नारदां कडून आपल्यास पारिजात पुष्प प्राप्त झालं आहे, असं आईसाहेबांचे कानीं आलं

कृष्णाः—ऐकतों आहें. पुढें यांत रागाचें कारण काय?

दासीः— सरकार, तें आपल्यास प्राप्त व्हावँ अशी आज्ञा केली असतां ती पूर्ण न झाल्यामुळें जरा वाईट वाटलं.

कृष्णा:—पुष्प प्राप्त झालं असं कुणाकडून समजलं?
दासी:—मुनिराजच इथं आले होते.
कृष्णा:—मग ठीक. तरिम्हटलं पुष्प मी न दिलं म्हणून इतकं रुसायला नको.
चित्रांगी:—रुक्मिणीस मिळालं. आपल्यास मिळावँ अशी इच्छा होती तेव्हां वाईट वाटलँ.
कृष्णा:—हें जर खरं तर या गोष्टीची तजवीज केल्यावर मग तरी रोष टाकून माझ्याशीं नित्या प्रमाणें वागणूक होईल?
चित्रांगी:—होईल माहाराज यांत काय संशय? आपलं मनुष्य आपल्यावर रुसणार व आपण समजून केल्यावर समजुतीस येणार.
कृष्णा:— इतकंच ना? तर ही थोडी गोष्ट आहे.(असें म्हणून खांद्यावर हात ठेवून.) प्रिये, हे तुझे मनोरथ मी पूर्ण करीन. परंतु आतां अशी रुसूं नकोस. रोष टाक. आणि नित्याप्रमाणें मधूर शब्द बोलून, माझा आदर करून मला सूख दे. ऊठ बरें वरती (इतक्यांत सत्यभामा उठून कृष्णाचा शेला डोळ्यावर घेऊन स्फुंदत स्फुंदत म्हणते—)
सत्यभामा:—मी स्वामी सेवे विषयीं तत्पर असतें! आणि बोलतांना मोठी प्रीति दाखवून कृति विपरित करावयाची! हें योग्य दिसावं ना दासी?
चित्रांगी:— जी: काय केलं असं स्वामीचं म्हणणँ आहे.
सत्यभामा:—हेंच फूल मला देण्यास कां कठीण-

पडावें?

कृष्णाः—प्रिये, येजवळ पलंगावर बैस तरी!

सत्यभामाः—(जवळ बसून.) काय आज्ञा व्हावयाची ती व्हावी. मी काय दूर आहें जवळच आहें. दूर टाकायची होते, म्हणून रुसतें. (इतक्यांत गळा दाटून आला.) अंतःकरण ओळखिलं असून असा मुद्दाम विनोद करायाचा. असो.

कृष्णाः—बरं सुंदरी असं पहा, एक वस्तु कुणाही एकीला मिळेल. हें तुला समजत नाहीं?

सत्यभामाः—तिला मात्र दिलँ आणि मला नाहीं. मला तें एकच पुरतँ असतं. अधिक मागत नव्हतें.

कृष्णाः—हे लावण्यवति? (तिचा हात धरून.) जर तुली देतों, तर ती रुसली असती! तिला दिलं तेव्हां तूं रुसलीस. म्हणून मजवर रुसावा आहेच. श्लोकः—

॥ बिलद्वाहिबिलादंतस्थितमार्जारसर्पयोः ॥ मध्येआखुरिवाभातिभार्याद्वययुतोनरः ॥१॥ बिळांत सर्प आणि बाहेर मांजर या दोघांमध्यें सांपडलेल्या उंदिरा प्रमाणें दोन स्त्रियांच्या पतीची दशा होते. असँ कवि बोलले तें हेंच. पुष्प एकच होतं, एकीस दिलँ; सर्वआपल्याच आहेत. यांत शहाणीनें उगाच रुसून आपल्यास खेद करून घ्यावा काय?

सत्यभामाः—तेंच कशास पाहिजे? हेंच पहा तुकतंच आपल्या बोलण्यांत ऐकिलं कीं, जो तुला दुःख देणारा त्यास नाहिंसा नकेला तर माझें (मुखावर पदर घेऊन.) मुखाव लोकन सुध्दां तूं करूं नको. त्यां

त आतां या दुःखास कारण कोण? व त्यास दंड क: सा कुणी करावा हें ऐकणार आहें तर सांगावें. नाहीं पेक्षां ज्याच्या दोघी स्त्रिया त्याची इतकी दुर्दशा, तर आपल्या सहस्त्रावधि स्त्रिया आहेत म्हणून ती गोष्ट आपणास लागू होत नाहीं, हें खचितच आहे. ऐकू आहेसें दिसतं. आतां तर मी जिंकलें ना? बरी मौज झाली.

चित्रांगीः—बरीच युक्तीनें कुंठित करण्याची आपणां मसलत केली. जिंकलंत यांत संशय नाहीं. हा बुद्धिबळांचा खेळच झाला आहे. वाः! आतां याचें उत्तर काय येतें पाहूं. उत्तर न झालें तर आई साहेबांनी जिंकलं हें निर्विवाद आहेच.

सत्यभामाः—आम्हीं या ठिकाणीं सर्व दासीच आहोंत. मीही या पायांची दासीच आहें किं नाहीं हें दास्यच जन्मभर असावें म्हणजे झालें. बरें आतां उत्तर ऐकुंया! गडबड करूं नका. (सर्व असामी काय उत्तर होतें म्हणून ऐकतात. कृष्णा कांहीं वेळ विचार करून.)

कृष्णाः—स्त्रियांनीं पुरुष जिंकलाच आहे! तो आतां जिंकायचा असें नाहीं.

सत्यभामाः—हां. आतां किती बोलायचें होईल तें होऊं दे. परंतु जिला फूल मिळालं तिनें मात्र जिंकलं खरं. मी आपल्याच मुखांतील शब्द धरूनत्याचा निर्वाह कसा असें विचारून आपल्याच मनांत जिंकलें असें मानून आहें. परंतु तें म्हणणें वाच्यानें

मेघ वितळतो तसें केव्हां वितळून जाईल तें समजणार नाहीं.

कृष्णा:--हा जो तुझा राग मजवर झाला त्या बरोबर मीच लबाड असं तुझं म्हणणं खरंच. परंतु विचार केला असतां रुक्मिणीस फूल दिलें आणि तुला देण्यास मी असमर्थ आहे असं तुला वाटलें म्हणून तूं रुसलीस. आतां फूल एकच होतं तें एकीस मिळालं म्हणून बाकी सर्व स्त्रियांनीं रुसावं काय? तुझ्या वांचून बाकीच्यांनीं कां रुसूनये. बरें तुला फूल पाहिजे तर एकच-सें काय! सर्व वृक्षच आणून लावतों! सर्वांना फुलें मिळूंदे. तूं रुसावा करून तुला मिळतील; आणि बाकीच्यांस न करितां मिळतील. कारण मनोरथ समजल्या वर पुरविणं हें काम माझं आहे! पण समजलं मात्र पाहिजे. जें पाहिजे तें आपण मागावें. दिलेंना हींतर रुसावं हें योग्य. तेव्हां उगाच जो तुला राग झाला हा तुझा शत्रू म्हणून यानें वस्त्रालंकार टाकून तुला नुसत्या जमिनीवर निजविलें. तो आतां नाहिंसा झालाकीं नाहीं तो विचार करून पहा. तो माझा शत्रू होता तों पर्यंत तुझें हास्यविनोद प्रेमकटाक्ष आलिंगन हीं मला इतकीं दूर झालीं होतींकीं; पुन्हा तुझ्याशीं गोडीगुलाबी होईल अशी आशाहि राहिली नव्हती. तो दुष्ट जेव्हां नाहिंसा झाला त्यावेळीं तूं बोलूं लागलीस, व बोलवूं लागलीस. तो दुष्ट नाहिंसा झालाकीं नाहीं? मी दंड-

करणारा आणि तो करून घेणारा, समजलँ?

सत्यभामाः— चित्रांगी ऐकलंस ना? जसं सांगित लं होतं तसंच झालंकीं नाहीं तें पहा? माझा सर्व विश्वास राहतो त्यास हेंच कारण! म्हणजे बोलायाची नाहीं; असा जो नियम केला होता तो आतां कुठं केव्हांच गेला कोण जाणं? म्हणूनच या चरणांची पूर्ण मर्जी असावी असं इच्छितें. व ती नाहीं, असें भासलं म्हणजे रुसून बसतें. पण मी बोलून किती बोलेन! आतां उगाच रुसावा मी करून रुसावा जोडला असं झालं कीं नाहीं. तेव्हां त्याची क्षमा मागण्या साठीं शरणच जावं दुसरा इलाज नाहीं. आणि या ठिकाणीं जो दुसरा इलाज करावा तो ही एक अपराधच होणार. तर शरण जाऊन क्षमा मागावी नाहीं? तुम्हाला कसं वाटतं.

चित्रांगीः— मी ती काय व मला आपल्यास सांगण्या सारखं काय कळत आहे! परंतु अनुमोदन लहानाचं सुध्दां घ्यावं; म्हणून विचारतां तर आम्हां सेवकांसह शरण जावं हेंच उचित होतं.

सत्यभामाः— (कृष्णास.) तर मग मी आपल्यावर कारणा वांचून रुसून समजूत करण्याचे श्रमदिले. याच अपराधाची क्षमा मागतें. शरण येतें इकडे लक्ष असो. (असें म्हणून सर्व नमस्कार करितात.) नमस्कार करितांच कृष्णानीं सत्यभामेस आलिंगन दिलें. उभयतांचा कंठ भरून शब्द अस्पष्ट येऊं लागला. प्रेमाश्रूंनीं परस्परांचें आंग भि-

जलें. मग तिची नीट समजूत कृष्णानीं केली. दासीस वस्त्रालंकार देऊन उभयतांनीं आपला आश्रय शोभविला. त्यांनीं उभयतांची सेवा करून आपलें दास्यकर्म गाजविलें. (कृष्णार्पणमस्तु.)

समाप्त.